# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे

# Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere

(Established by Government of Maharashtra and Governed by Dr .Babasaheb Ambedkar Technological University Act No. XXIX of 2014)

विद्याविहार, लोणेरे-रायगड ४०२ १०३ (महाराष्ट्र) Vidyavihar, Lonere - Raigad 402 103 (Maharashtra)

Tel: (02140) 275142 Student Helpline: 02140-275212

Website: www.dbatu.ac.in, E-mail: registrar@dbatu.ac.in

दिनांक: १९/०६/२०२३

**प्रेस नोट**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचा (State Affiliating Technological University of Maharashtra) २५ वा दिक्षांत समारंभ सोमवार दिनांक. १९/०६/२०२३ रोजी दुपारी २.०० वाजता विद्यानगरी लोणेरे, रायगड या विद्यापीठाच्या मुख्यालयात पार पडला. सदरचा दिक्षांत समारंभ महाराष्ट्र राज्याचे माननीय राज्यपाल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलपती श्री. रमेशजी बैस यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. श्री. चंद्रकांत दादा पाटीलजी, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते व श्री. उदयजी सामंत, मा. मंत्री उद्योग व पालक मंत्री रायगड हे सन्मानित अतिथी म्हणून या दिक्षांत समारंभात उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचा २५ व्या दीक्षांत समारंभात ३३९ पदविका, १९ प्रगत पदविका, २१३०४ पदवी, ५९२ पदव्युत्तर पदवी, १३ विद्यावाचस्पती एकूण २२२६७ इतक्या पदव्या प्रदान करण्यात आल्या. सदर समारंभात मा. राज्यपाल महोदय व विद्यापीठाचे कुलपती श्री. रमेशजी बैसजी, मा. श्री. चंद्रकांत दादा पाटीलजी, मंत्री उच्च व तंत्र शिक्षण व मा. श्री. उदयजी सामंत, उदयोग व पालक मंत्री रायगड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच मा. कुलगुरु प्रा. कारभारी वि. काळे यांनी विद्यापीठाचा अहवाल सादर केला.

मा. राज्यपाल महोदयांनी या विद्यापीठाचा स्थापना दिवस हा माजी विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्यात यावा अशी सुचना केली. तसेच विद्यापीठ व सर्व विद्यार्थ्यांना पदवीसाठी व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमात मा. श्री. चंद्रकांत दादा पाटील, मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांनी या विद्यापीठाच्या विभागीय केंद्र व उपकेंद्राकरीता पारंपरिक विद्यापीठाकडून १ एकर जागा उपलब्ध करुन देण्याची घोषणा केली तसेच मा. श्री. उदयजी सामंत, उदयोग व पालक मंत्री रायगड यांनी या विद्यापीठात उभारावयाच्या श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाच्या परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी रायगड जिल्हयाच्या DPDC मधून १.५० कोटी देण्याची घोषणा केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम २०१४ चा २९ अन्वये महाराष्ट्र राज्याचे हे तंत्रशास्त्र विद्यापीठ नावारुपाला येवून भारतात अव्वल स्थान प्राप्त करावे व जगभर प्रसिध्दी मिळावी अशी अशा सर्व मान्यवरांनी व्यक्त केली.

यावर्षीच्या पदवीदान समारंभाचे एक ठळक वैशिष्टये म्हणजे मा. राज्यपाल महोदयांनी पदवीदान केल्यानंतर लगेच सर्व पदव्या NAD (National Academic Depository) मध्ये सुध्दा Digital माध्यमातून विद्यार्थ्यांच्या Digilockar अकाऊंटमध्ये विद्यापीठाने उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. हा उपक्रम महाराष्ट्रात अशा प्रकारचा Digilockar व्दारे त्याच दिवशी पदव्या उपलब्ध करुन देण्याचा उपक्रम महाराष्ट्रात पहील्यांदाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाने केलेला आहे. याचे कौतूक सर्व स्तरातून होत आहे.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. बी. एफ. जोगी यांनी सर्वांचे आभार मानले.

ठिकाण:

दिनांक:

(डॉ. भगवान फ. जोगी)
कुलसचिव